**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ५६/२०१५-१६/२३ दिनांकः२५-०४-२०१६

**<u>आदेश</u>**

**<u>आदेश केस क्र. ५६/२०१५-२०१६</u>**

श्री.आनंदा रामू चौगुले
मु.पो. बहिरेवाडी ता.आजरा
जिल्हा- कोल्हापूर. अर्जदार

विरूध्द

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, कोल्हापूर

२) कार्यकारी अभियंता, विरुध्द पक्षकार
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, गडहिंग्लज.

३) उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभाग, आजरा.

**कोरमः-** १. श्री. पी.व्ही.खपली, सदस्य सचिव,
२. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**<u>न्याय निर्णय</u>**

मी श्री. पी.व्ही.खपली, सदस्य सचिव ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहे.

आज दि.५.४.२०१६ रोजी सकाळी ११.३० वा. ग्राहक तक्रार निवारण मंच महावितरण परिमंडल कार्यालय,ताराबाई पार्क, कोल्हापूर येथे के.क्र. ५६/२०१५-१६ याची सुनावणी घेण्यांत आली. सुनावणीसाठी श्री. आनंदा रामू चौगुले हे ग्राहक स्वत: उपस्थितीत होते. महावितरण तर्फे श्री. एम.एस. संकपाळ नोडल ऑफिस तर्फे हजर होते. श्री. रामचंद्र नारायण लोंढे उपकार्यकारी अभियंता महावितरण उपविभाग आजरा आणि श्री. संदीप तुकाराम सुतार सहा. अभियंता, उत्तूर हे हजर होते.

## तक्रारारीचे स्वरुप व ग्राहकाची मागणी

श्री. आनंदा रामू चौगुले मु.पो. बहिरेवाडी यांनी दि. २९.१.२०१६ रोजी अ फॉर्म मध्ये ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर येथे आपणांस त्वरीत वीज जोडणी मिळावी अशा त-हेचा अर्ज केला आहे. श्री. चौगुले यांनी यापूर्वी क्ष फॉर्म मध्ये अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर येथे याच कारणासाठी तक्रार दाखल केली होती त्याचा निकाल १७ ऑक्टो. २०१५ रोजी पुढील प्रमाणे देण्यात आला. उपकार्यकारी अभियंता आजरा यांनी नविन कंत्राटदार निश्चित झाल्यानंतर पाठपुरावा करुन तक्रारदाराचे कनेकशन देणे साठीची कार्यवाही करावी.सदर आदेशाची अमलबजावणी न झाल्यामुळे श्री. चौगुले यांनी मंचाकडे अर्ज दाखल केला. सदर अर्जामध्ये श्रीयुत चौगुले ग्राहक क्र. २५५०३०००२५९६ यांनी रु. ५६५/- दि. २०.६.२०१४ रोजी पावती क्र. २०९२८२४ नुसार जमा केलेचे म्हंटले आहे घरी वृध्द आई असून शाळेला जाणारी मुले आहेत तरी मला त्वरीत वीज कनेक्शन मिळावे अशी मागणी त्यांनी केली आहे या जोडणीसाठी नियमापेक्षा खूपच अधिक वेळा झाला आहे. तरी आता वेळ लागू नये अशी अपेक्षा त्यांनी प्रत्यक्ष व्यक्त केली.

## विरुध्द पक्षाची भूमिका

कोल्हापूर मंचाच्या दि. ६.२.२०१६ च्या मुदेनिहाय उत्तर मागणीच्या पत्रावर आजरा उपविभागचे उत्तरासाठी दि. २३.२.२०१६ च्या पत्राने सात दिवसाची जादा मुदत मागितली होती त्यानुसार त्यांनी दि. १५.३.२०१६ च्या मुदे निहाय उत्तर पाठविले त्यामध्ये त्यांनी कक्षाच्या निकालानुसार दोन मंजूर पोलचे काम दि. १०.३.२०१६ रोजी पूर्ण झाले आहे. अर्जदार यांना टेस्ट रिपोर्ट देणेबदल तोंडी सांगितले आहे आणि तो देताच वीज जोडणी देण्याची कारवाई करता येईल असे म्हंटले आहे तोंडीही त्यांनी हीच माहिती सांगितली. प्रत्यक्ष चर्चेवेळी पहाणी अहवाल मधील पोलचे अंतर आणि लाईन ओढणी या संबंधी कांही हरकती उपस्थित झाल्याने वीज जोडणीस उशीर झाल्याचे दोन्ही पक्षानी मान्य केले सदर अडथळा दूर करुन त्वरीत वीज जोडणी देत असलेचे विरुध्द पक्षकार तर्फे श्री. लोंढे यांनी निवेदन केले. वरील सर्व तोंडी व लेखी माहितीच्या आधारे मंचा समोर खालील मुददा उपस्थित होतो.

१. ग्राहकाची मागणी मान्य करता येईल का?

उत्तर :- होय.

२. आदेश

उत्तर :- अंतीम आदेशानुसार.

## कारणमिमांसा

उभय बाजूंची सर्व बाबीमध्ये सहमती झाली आहे. नियमाप्रमाणे विज जोडणी देणेचे वि.प. ने मान्य केले आहे. याची नोंद मंच घेत आहे. उभयपक्षी सर्व सहमती झालेले आहे नियमाप्रमाणे सर्व मंजूरी आहे तरी अधिक उशिर न लावता दि. ३०.४.२०१६ पूर्वी विदयुत जोडणी देण्यांत येईल असे महावितरणचे अधिका-यांनी मान्य केले सबब मुददा क्र.१ चे उत्तर होय असे आहे.

## आदेश

१. दि. ३०.४.२०१६ पूर्वी वीज जोडणी देण्यांत यावी.

२. सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३. निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

सही/-
(पी.व्ही. खपली)
सदस्य सचिव

अध्यक्ष पद दिनांक १६-१२-२०१४ पासून रिक्त.

सही/-
श्री. पी. एस. बुरांडे,
ग्राहक सदस्य,

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.